F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१.

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


संकेतस्थळ : अधिसूचना

कालमर्यादित -

का.क्र.१८/तंशिसं/संस्था-संकेतस्थळ-पत्र /MCM/२०१८/३६६-अ

दिनांक:- १२/१०/२०१८

प्रति,

सर्व प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता

(मान्यताप्राप्त तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था)

**विषय :- केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती ( मेरीट-कम-मिन्स ) योजनेअंतर्गत National Scholarship Portal वर विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी (Scrutiny) करण्याबाबत.. सन २०१८-१९ .**

**संदर्भ :-** १) अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक २४/०७/२०१८ च्या ई-मेलद्वारे प्राप्त सन २०१८-१९ साठीचे योजनेचे वेळापत्रक

२) या कार्यालयाची अधिसूचना क्र. No. 18/DTE /MCM-Advt./2018/285 dtd. 13/08/2018

३) अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून क्र.एफ नं.९-३३/२०१८/एसएस दि. २४/०९/२०१८ चे सन २०१८-१९ साठीचे योजनेसाठी वाढविण्यात आलेल्या मुदतीबाबतचे ई-मेलद्वारे प्राप्त पत्र

४) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/सं.क्र.१८६८/तांशि-४ दि.१२/१०/२०१८

संदर्भ क्र. १ च्या नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त पत्रानुसार, सन २०१८-१९ करीता **गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती** (Merit – Cum- Means) योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (संकेतस्थळ : www.scholarships.gov.in) वर ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी संदर्भ क्र. २ ची अधिसूचना जाहीरातीद्वारे प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये, सदर योजनेसाठी नवीन व नूतनीकरणाचे अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/१०/२०१८ आहे.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने, सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या सदर योजनेसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरलेल्या व संस्थेकडे पाठविण्यात आलेल्या अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) केंद्र शासनाने दिलेल्या दि. **३१/१०/२०१८ तारखेपर्यंत** करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे जेणेकरुन विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देता येईल. **संस्थेने कोणताही अर्ज त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये तपासणीसाठी शिल्लक राहू देऊ नये.**

तसेच संबंधित संस्थांना अशाही सूचना करण्यात येत आहेत की, केंद्र शासनाने दिलेल्या मुदतीमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन अर्ज संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचे राहिले तर असे अर्ज सिस्टीमव्दारे नामंजूर (संस्थेने ऑनलाईन तपासणी न केल्यामुळे) करण्यात येतील आणि याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख/ प्राचार्यांची राहील. तरी त्यांनी याबाबत स्वतः लक्ष द्यावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.

( डॉ. अभय वाघ. )

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत - यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त संबंधित सर्व संस्थांना सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई ४००००१

२) मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

३) मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.

४) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद.




Scanned by CamScanner